# मोक्षप्राप्तीची उत्कंठा

## ‘मुमुक्षुत्व’

### बेन विलियम्स् यांच्याद्वारे लिखित भाष्य

या जगातील आपल्या प्रवासात, कधीकधी आपल्याला असे जाणवते की, मनुष्य असण्याचा अर्थ आणखी काहीतरी आहे, या जीवनात आणखी काहीतरी आहे; त्याहूनही अधिक आहे जितके सद्य स्थितीत आपल्याला उमजते आहे. आणि या जाणीवेबरोबरच आपल्यात एक अंतःस्फुरित समजदेखील असू शकते की, जरी आपण रूढिबद्ध आणि परंपरागत असलेली ती सर्व ध्येये साध्य केली, जी आपण स्वतःसाठी निश्चित केलेली असतात, तरीदेखील सरतेशेवटी आपल्याला त्याने खरी संतुष्टता मिळणार नाही.

मग, ते काय आहे ज्याचा शोध आपण खरोखर घेत आहोत? आपण अशा सुखाच्या शोधात आहोत जे कधीही लोप पावत नाही. आपल्याला अशा आंतरिक स्वातंत्र्याची उत्कंठा आहे जे अविचल आहे. अंतरीची ही साद कदाचित सूक्ष्म असू शकते, परंतु ती अतिशय मोलाची असते. जीवनात आणखी काहीतरी आहे ही भावना एक शुद्ध स्पंद आहे—आपल्या खऱ्या स्वरूपाच्या व्यापकतेप्रति, आपल्या खऱ्या स्वरूपाच्या असीमिततेप्रति जागृत होण्याचा स्पंद.

शैवमताचे प्रतिपादन करणारे सिद्ध महात्मा म्हणतात की, ही उत्कंठा स्वयं चितीतच निहित असते, ही उत्कंठा तिचा अंगभूत स्वभावच आहे. त्यांची शिकवण अशी आहे की, ज्या क्षणी सर्वव्यापिनी चिती उत्पत्ती करण्याचा निश्चय करते, तेव्हा ती या जगतरूपी नाट्यात अभिनय करण्यासाठी स्वेच्छेने स्वतःच्या स्वातंत्र्याचा आणि पूर्णत्वाचा त्याग करते. अशा प्रकारे, एका अभिनेत्याप्रमाणेच चिती स्वेच्छेने, मुक्तपणे एका जीवात्म्याची भूमिका ग्रहण करते. जन्म-मरणाच्या आणि मग पुनर्जन्माच्या अनेक चक्रांमधून जात असताना त्या जीवात्म्यात स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची ही स्मृती टिकून राहते की, तो स्वतः सर्वव्यापिनी आणि आनंदमय चिती आहे; ही स्मृती हृदयात अगदी खोलवर अप्रकट रूपात रुजलेली असते. आपल्या अनंत स्वरूपाची ही स्मृती जेव्हा जागृत होते, तेव्हा आपण तेच मूळ स्वातंत्र्य आणि तोच उन्मुक्त आनंद पुन्हा प्राप्त करण्यासाठी प्रवृत्त होतो, जो संपूर्ण प्राणिमात्राचा आधार आहे व जो त्यांना सचेतन बनवतो, आपण तो अद्‌भुत ‘बोध’ प्राप्त करण्यासाठी प्रवृत्त होतो ज्यात सर्वकाही एकरूप असते.

महत्त्वाचे वळण मिळण्याचा क्षण तो असतो, जेव्हा या अंगभूत उत्कंठेची *जाणीव* आपल्याला होते, जी स्वतःच त्याचे एक स्फुलिंग असते, ज्याची आपल्याला उत्कंठा असते. अंतरीच्या या हाकेला संस्कृतमध्ये 'मुमुक्षुत्व' म्हणतात अर्थात मोक्षप्राप्तीची उत्कट इच्छा, परम सत्य जाणून घेण्याची तीव्र अभिलाषा.

'विवेकचूडामणि', श्री शंकराचार्य यांच्याद्वारे रचित वेदान्त तत्त्वज्ञानावरील एक संक्षिप्त आणि मर्मभेदक ग्रंथ आहे, ज्यामध्ये म्हटले आहे :

> दुर्लभं त्रयं एवैतद् देवानुग्रहहेतुकम्।
> मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः॥
>
> या तीन गोष्टी अत्यंत दुर्लभ आहेत आणि केवळ भगवत्कृपेनेच [भगवंताच्या अनुग्रहानेच] प्राप्त होतात : मनुष्यजन्म, मोक्षप्राप्तीची उत्कंठा [मुमुक्षुत्व] आणि महापुरुषाचा आश्रय.[१]

भारतीय तत्त्वज्ञान-परंपरांमध्ये, मनुष्यजन्म हा अतिदुर्लभ आणि अनुपम असा उपहार समजला जातो, कारण मनुष्यामध्येच चितीच्या अमर्याद स्वातंत्र्याप्रति जागृत होण्याची क्षमता व सामर्थ्य असते. आणि स्वातंत्र्याच्या किंवा मुक्तीच्या या उत्कंठेविषयी जागरूक होणे हे मनुष्यजन्मात आलेले महत्त्वाचे वळण मिळण्याचा क्षण दर्शवते. या दोन अपरिमित अशा आशीर्वादांबरोबरच, दिव्य कृपेचे परम कृत्य हेदेखील एक तत्त्व आहे, ज्याद्वारे आपल्याला सद्गुरू प्राप्त होतात आणि सरतेशेवटी आपण त्यांचा आश्रय घेतो; कारण, अशा आत्मसाक्षात्कारी सद्गुरूंमध्येच दिव्य शक्तिपात दीक्षारूपी महाप्रसाद प्रदान करण्याचे सामर्थ्य असते.

शक्तिपात दीक्षा थेट, दिव्य कुंडलिनी शक्तीला जागृत करते, त्यानंतर ती शक्ती श्रीगुरूंच्या कृपाछत्राखाली केलेल्या आपल्या अनुशासित आध्यात्मिक अभ्यासांद्वारे उन्मीलित होते. आपल्या आंतरिक शक्तीचे हे उन्मीलन किंवा विकास, मोक्षप्राप्तीची आपली उत्कंठा वृद्धिंगत करतो आणि या मार्गावरील आपल्या उन्नतीच्या गतीचा वेग वाढवतो. अशा प्रकारे, एक मुमुक्षू उत्तरोत्तर परिपक्व होत जातो आणि आत्म्याचे पूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी तयार होतो.

महान सिद्धांच्या शिकवणी सदैव ही उत्कंठा जाणून घेण्याच्या महत्त्वाविषयी गुणगान करतात. गुरुमाईंच्या शब्दांमध्ये :

मुमुक्षुत्व म्हणजे मोक्ष प्राप्त करण्याचा दृढनिश्चय. हीच ती ज्वलंत इच्छा आहे, जी मनुष्याकडून सत्याचा शोध करवून घेते. अशा मनुष्याला मुमुक्षू म्हणतात, जो अंतरीच्या महानतर शक्तीला जाणण्यासाठी, दिव्य ज्ञानाचे अर्जन करण्यासाठी स्वतःचे बलिदान करण्यास तत्पर असतो.

एका खऱ्या मुमुक्षूची इच्छा असते की, ते सर्व अवरोध तोडून त्यांतून बाहेर पडावे, जे त्याला त्याच्या सीमिततांमध्ये जखडून ठेवतात. मुक्तीची अविस्मरणीय तळमळ बाळगून तो सत्याशी एकरूप होण्यास दृढनिश्चयी असतो. अतः अहंकाराचा लेशमात्रसुद्धा त्याच्यासाठी कष्टदायक असतो. एक मुमुक्षू भगवंताच्या इच्छेप्रति स्वतःला पूर्णपणे समर्पित करण्यास अथकपणे प्रयत्नशील असतो.

मुमुक्षू बना : महान सत्याशी एकरूप होण्यासाठी पूर्ण हृदयापासून उत्कंठित राहा.[२]

मुमुक्षू असण्याचा बोध हा या गोष्टीचा सूचक आहे की, आपली साधना स्वाभाविकपणे उन्मीलित होते आहे आणि आपले आध्यात्मिक अनुशासन फलीभूत होते आहे. ही उत्कंठा जरी विभिन्न मात्रांमध्ये आणि निरनिराळ्या स्वरूपांमध्ये अनुभवास येत असली, तरीही ती अधिकांशतः एका आंतरिक दृढनिश्चयाच्या रूपात प्रकट होते—ते अवरोध संपुष्टात आणण्याचा दृढनिश्चय जे आपल्याला सीमित करतात तसेच प्रज्ञान, करुणा, निर्भयता आणि महान स्वातंत्र्यासह जगण्याचा दृढनिश्चय. मोक्षप्राप्तीसाठी एका विशुद्ध हृदयाने केलेले समर्पण हेच आपल्याकरता एक अचूक आणि योग्य दिशा निर्धारित करते, ज्यामुळे आपल्याला स्वतःच्या नानाविध प्रेरणांचे संदर्भ किंवा उद्देश स्पष्टपणे समजतात आणि याच्या फलस्वरूप आपल्या अंतरातील ती सर्व स्थाने प्रकाशात येऊ लागतात, जी मोक्षप्राप्तीच्या या ध्येयाशी सुसंगत नसतात.

या उत्कंठेचा विकास कशा प्रकारे करता येईल? मुक्त होण्याचा दृढनिश्चय हा मोक्षाप्रत नेणाऱ्या आध्यात्मिक अभ्यासांप्रति स्वतःला समर्पित करण्याच्या इच्छेच्या रूपात व्यक्त होऊ शकतो. ध्यानाविषयी आपल्याला गोडी वाटू लागते, दिव्य नामसंकीर्तनाच्या माधुर्यात आपल्याला रस वाटू लागतो आणि आपल्याला मंत्रजप करण्यात आनंद वाटू लागतो. सत्याचे ज्ञान असणाऱ्या महापुरुषांच्या बोधप्रद वचनांचे अध्ययन तसेच महात्म्यांच्या दर्शनप्राप्तीकरता आपण परिश्रमपूर्वक प्रयत्न करतो. आपल्या जीवनाच्या अनुभवाविषयी आपण गहनतेने मननचिंतन करतो आणि आपल्या खऱ्याखुऱ्या योग्यतेचा आपल्याला पुन्हा शोध लागतो. जीवनापासून पळ काढण्याऐवजी, आपल्याला हे उमगते की, आपल्यासमोर जे काही येते, त्यामध्ये चितीला ओळखण्याच्या व प्रत्येक परिस्थितीतून काही

शिकण्याच्या आपल्या क्षमतेतच स्वातंत्र्य किंवा मुक्ती निहित आहे; आणि असे करणे आपल्याला उत्साहाने व पराक्रमाने भरून टाकते. आपल्याला हे समजते की, जीवनातील अडचणींना सामोरे गेल्याने आणि त्यांच्यातून वाट काढत राहिल्याने आपण मुक्तीचा आपला अनुभव वृद्धिंगत करू शकतो. अत्यंत तत्परतेने आपण विभिन्न मार्ग अनुसरून स्वतःला त्याच्याशी संलग्न करतो, जे आपल्याला सत्संगाच्या आणखी निकट घेऊन येते, जे आपल्याला अंतरातील 'परम सत्याशी' समरस करते.

आपण स्वतः दिव्य आहोत या अभिज्ञानात प्रतिष्ठित होण्याच्या या प्रवासासाठी आवश्यकता असते ती प्रयत्नाची, पराक्रमाची आणि जसे गुरुमाई म्हणतात, बलिदानाची. तरीही, मुक्तीच्या या उत्कंठेचा प्रबळ आवेग आनंदमय असतो आणि तो अनंत संभावनांचा एक रोमांचक भाव उत्पन्न करतो. आपल्या हृदयात मुमुक्षुत्व जसजसे विकसित होत जाते, तसतसे आपल्यात खरी दृढता आणि खरे साहस विकसित होत जातात. मुक्त होण्याचा हा साहसपूर्ण आवेग, आपणहून, बळाच्या एका स्रोताप्रमाणे कार्य करतो.

---

[१] विवेकचूडामणि ३, इंग्रजी भाषांतर ©२०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.

[२] गुरुमाई चिद्विलासानंद, प्रशांतीने स्पंदित : दैनिक चिंतन [चित्शक्ती पब्लिकेशन्स्, चेन्नई, २०१४], ४ मे.

©२०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.